MHRG190009812023

:: <u>भुसंपादन निर्देशन अर्ज क्र.५१/२०२० मधील निशाणी क्र.१७ वरील आदेश</u> ::

प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश १, नियम १० अन्वये त्यांना प्रस्तुत भुसंपादन निर्देशन अर्जामध्ये समाविष्ट करुन घेण्याबाबत विनंती केली आहे.

०२. अर्ज व अर्जाला **मुळ** अर्जदारने दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही पक्षाच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०३. अर्जदाराचे कथन की, मौजे करंजाडी, ता.महाड, जि.रायगड येथील गट क्र.२८६ आणि गट क्र.२८९ मधील एकुण क्षेत्र ०–६६–६ या क्षेत्रफळाची जमीन नागेश्वरी लघुपाटबंधारे धरण प्रकल्पाकरिता संपादित करण्यात आलेली असुन त्या क्षेत्राची वाढीव नुकसान भरपाई मिळण्याकरिता श्रीमती विठाबाई महादेव बामणे यांनी भुसंपादन निर्देशन अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जातील मिळकती या मुळच्या कै.महादेव आबा बामणे यांच्या वडिलोपार्जित मिळकती असुन त्यांच्या इतर ब–याच मिळकती होत्या व आहेत.

०४. अर्जदाराचे पुढे असे कथन की, अर्जातील नमुद मिळकती या कै.महादेव आबा बामणे यांच्या वडिलोपार्जित मिळकती असल्याने हिंदु वारसा कायदयाप्रमाणे सदर मिळकतीमध्ये कै.महादेव आबा बामणे यांचे

वारस म्हणुन जन्मतः हिस्सा आहे. सदरच्या मिळकती कै.महादेव आबा बामणे यांनी त्यांची दुसरी पत्नी विठाबाई महादेव बामणे यांच्या नावे कोणत्याही कायदेशीर दस्ताने हस्तांतरीत केलेली नाही तसेच सदरच्या मिळकती इतर वारसांचा हक्क डावलुन हस्तांतर करण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही. सदर मिळकतीमध्ये कै.महादेव आबा बामणे यांचे सर्व वारस म्हणजेच अर्जदार विठ्ठल महादेव बामणे, नंदकुमार महादेव बामणे(मयत) वारस आशा (पत्नी), हिमाणी राजेश मोरे(मुलगी), शिवाणी सचिन साळुंके(मुलगी), आणि चंद्रकांत महादेव बामणे असे वारस असुन त्यांना अर्जदारपणात पक्षकार म्हणुन सामील करुन एल.ए.आर अर्जाचा नुकसान भरपाईचा वाढीव निवाडा मुळ अर्जदार विठाबाई व विठ्ठल महादेव बामणे, चंद्रकांत महादेव बामणे, आशा नंदकुमार बामणे, हिमाणी राजेश मोरे व शिवाणी सचिन साळुंके यांचे नावे करण्यात यावा अशी विनंती केली आहे. सदर मिळकतीमध्ये विठाबाई व त्यांची मुले यांचा २५ टक्के हिस्सा तसेच विठ्ठल, चंद्रकांत व मयत नंदकुमार यांचा म्हणजे आशा, हिमानी व शिवाणी यांचा प्रत्येकी २५ टक्के हिस्सा आहे.

०५. अर्जदाराचे पुढे असे कथन की, महादेव आबा बामणे यांचे सर्व वारसांना नुकसान भरपाई अर्जाचे कामी पक्षकार म्हणुन सामील न केल्यास अर्जदाराचे अपरिमित आर्थीक नुकसान होणार आहे व त्यांना त्यांचे वडिलोपार्जित मिळकतीमध्ये असणा–या जन्मः वारसाहक्कास मुखावे लागेल या दृष्टीकोनातुन प्रस्तुतचा अर्ज मंजुर करुन कै.महादेव आबा बामणे यांचे वारस म्हणुन विठ्ठल महादेव बामणे, चंद्रकांत महादेव बामणे, मयत नंदकुमार महादेव बामणे यांचे वारस आशा(पत्नी), हिमाणी राजेश मोरे(मुलगी), शिवाणी सचिन साळुंके(मुलगी) यांना अर्जदारपणात सामील करुन त्यांचे

सर्वाचे नावाने, हिश्श्याप्रमाणे नुकसान भरपाईचे अवार्ड करण्याची विनंती केली आहे.

०६. याउलट अर्जदाराचे कथन की, प्रस्तुत अर्ज हा कायदयाने चुकीचा आहे. अर्जदार हे विशेष भुसंपादन अधिकारी यांचेसमोर हजर झाले नसल्यामुळे त्यांना प्रस्तुत प्रकरणात पक्षकार म्हणुन समाविष्ट करता येणार नाही. अर्जदारांनी त्यांचे हक्क सिध्द करण्यासाठी दिवाणी न्यायालयात जाऊन आपले हक्क सिध्द करावेत व त्यानंतर प्रस्तुतच्या भुसंपादन निर्देशन अर्जात पक्षकार म्हणुन समाविष्ट व्हावे. सबब, सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०७. अर्ज उभयपक्षाच्या परस्पर विरोधी युक्तिवादाचे विवेचन करण्यात आले. प्रस्तुतचा मुळ अर्ज संपादित जमीनीच्या मागणीची वाढीव बाजारभावाची रक्कम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. मुळ अर्जदार यांनी सदर अर्जास आक्षेप नोंदविला आहे. सदर प्रकरणाची पडताळणी केली असता असे दिसुन येते की, प्रस्तावीत अर्जदार हे संपादन प्रक्रियेमध्ये समाविष्ठ नव्हते. प्रस्तावित अर्जदारांना सदर मिळकतीमध्ये हक्क आहे किंवा नाही ही बाब या प्रकरणामध्ये विचारात घेता येणार नाही. प्रस्तावित अर्जदारांनी सदर अनुतोष दिवाणी न्यायालयातुन मिळविणे आवश्यक आहे. एकुणच मुळ अर्जदार यांनी उपस्थित केलेली हरकत तथा आक्षेप लक्षात घेता प्रस्तुत अर्जातील अर्जदार यांचे कथन उचित व न्यायसंगत नाही. याकामी मुळ अर्जदार यांच्या विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद ग्राहय धरण्यात येतो. सदर निष्कर्षास अनुसरुन खालील आदेश पारित.

 **भुसंपादन निर्देशन अर्ज क्र.५१/२०२०**
**निशाणी क्र.१७**

**:: <u>आदेश</u> ::**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2025.09.20 17:28:04 +0530

महाड **(श्रीमती एच.आर. जाधव)**

दिनांक २०.०९.२०२५ दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड